आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार दिनांक १२ मार्च २०२५

ठळक बातम्या

1. मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ जीसीएसके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रदान करण्यात आला.
2. राज्य लोकसेवा आयोगामार्फत इंग्रजीतून घेतल्या जाणाऱ्या कृषी अभियांत्रिकी सारख्या तांत्रिक परीक्षा मराठीतून घेतल्या जातील - मुख्यमंत्र्यांची विधानपरिषदेत घोषणा.
3. जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या कार्यपध्दतीत शासन निर्णयानुसार आजपासूनच नवीन बदल लागू महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा.
4. चंद्रपूरसारख्या प्रदूषणग्रस्त भागात एक समिती गठित करुन समितीच्या अहवालानुसार प्रदुषणासंदर्भात कारवाई केली जाईल, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांचे आश्वासन.

----------------------------------

सर्वोच्च नागरी सन्मान

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. भारत आणि मॉरिशसमधल्या ऐतिहासिक नात्याचा हा सन्मान असल्याचे पंतप्रधान यावेळी म्हणाले. मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान ‘द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ इंडियन ओशन’ या कार्यक्रमात त्यांना प्रदान करण्यात आला. मॉरिशसचे प्रधानमंत्री नवीन रामगुलाम यांच्यासोबत त्यांनी आज प्रतिनिधी स्तरावर चर्चा केली. यावेळी स्थानिक चलनात देवाण घेवाण, कर्ज पुरवठा, राजदुतांसाठी प्रशिक्षण, बंदरातल्या व्यवसायाच्या माहितीची देवाणघेवाण, आर्थिक गुन्हे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रात सहकार्य, अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण यासारख्या विषयांवर ८ सामंजस्य करार दोन्ही देशात झाले. भारत आणि मॉरिशसमध्ये असलेल्या भागीदारीविषयी ते म्हणाले..

*भारत और मॉरीशस का संबंध हमारी साझी सांस्कृतिक परंपराओं और मूल्यों से भी जुड़ा है। प्राकृतिक आपदा हो या कोविड विपदा, हमने हमेशा एक दूसरे का साथ दिया है। रक्षा हो, या शिक्षा, स्वास्थ्य हो या स्पेस, हम हर क्षेत्र में कंधे से कंधा मिलाकर चल रहे हैं।*

ग्लोबल साउथसाठी **MAHASAGAR** अर्थात **Mutual and Holistic Advancement for Security and Growth Across Regions** या उपक्रमाची घोषणा त्यांनी यावेळी केली. या अंतर्गत विकासासाठी व्यापार, शाश्वत वृद्धीसाठी क्षमता विकास, परस्पर सुरक्षा यावर भर दिला जाणार आहे. ग्लोबल साऊथ, हिंद महासागर आणि आफ्रिका खंडात मॉरिशसचं स्थान महत्त्वाचं आहे यावर संयुक्त निवेदनात पंतप्रधानांनी भर दिला. प्रादेशिक स्थैर्य आणि संपन्नतेसाठी भारत वचनबद्ध आहे. केवळ हिंद महासागराने नव्हे तर संस्कृती आणि परंपरेतूनही दोन्ही देश एकमेकांशी जोडले गेल्याचं ते म्हणाले.

----------------------------------

एमपीएससी

नव्या शिक्षण धोरणाच्या अनुषंगानं एमपीएससी म्हणजेच राज्य लोकसेवा आयोगामार्फत इंग्रजीतून घेतल्या जाणाऱ्या कृषी अभियांत्रिकी सारख्या तांत्रिक परीक्षा मराठीतून घेतल्या जातील अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात माहिती देतांना सांगितलं....

*न्यू एज्युकेशन पॉलिसी मध्ये आता आपल्याला अभियांत्रिकी देखील मराठीमध्ये घेण्याची मुभा मिळालेली आहे आणि म्हणून या संदर्भातली आता जे टेक्निकल कोर्स याची एमपीएससी परीक्षा मराठीत घेत नाही कारण त्याची पुस्तक उपलब्ध नाही त्याची पुस्तक तयार करण्यात येतील. एक कालबद्ध कार्यक्रम त्याचा आखण्यात येईल, एमपीएससीशी बोलून आणि त्याही परीक्षा या मराठीमध्ये घेण्यात येतील.*

----------------------------------

वेव्ज २०२५ परिषद

क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत होणाऱ्या वेव्ज २०२५ परिषदेत सिम्फनी ऑफ इंडिया स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी ११२ संगीतकारांनी अर्ज केले होते. त्यापैकी ८० शास्त्रीय संगीतकार तसंच लोककलाकारांची निवड

करण्यात आली आहे. दूरदर्शन आणि महावीर जैन फिल्म्स यांनी संयुक्तपणे या स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या उपक्रमाची अंतिम फेरी १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

---------------------------------

जन्म - मृत्यू प्रमाणपत्र

जन्म - मृत्यू प्रमाणपत्र ही अत्यंत आवश्यक गरज असून, त्याचा चुकीचा उपयोगही केला जात होता. याला प्रतिबंध व्हावा यासाठी या अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. आता कोणालाही याचा दुरुपयोग करता येणार नाही. केल्यास फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल असे निवेदन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात करून, विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यू नोंदीबाबतच्या कार्यपध्दती निश्चित केल्याच सांगत, सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार कालपासूनच महाराष्ट्रात नवीन बदल लागू होतील, अशी घोषणा केली. ही प्रमाणपत्रे देण्यासाठी तीन स्तरीय पडताळणी टप्पे निश्चित केले आहेत. **17** मुद्द्यांची पूर्तता केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. तथापि, अर्जदाराने जोडलेली कागदपत्रे (पुरावे) बनावट आढळल्यास तात्काळ फौजदारी कारवाई करण्यात येईल. यामुळ सरकारी व्यवस्थेतील उणीवांचा लाभ घेत जन्म-मृत्यू नोंदणीची प्रमाणपत्रे मिळविणाऱ्या परदेशी नागरिकांच्या हैदोसावर आता अंकुश बसणार आहे.

---------------------------------

चंद्रपूर प्रदुषण

चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्र हे आशिया खंडातील सर्वात मोठे औष्णिक वीज केंद्र आहे. या वीज केंद्राच्या रोपवे प्लांटमध्ये मोठ्या प्रमाणावर कोळसा साठवला जातो, जो रोपवेच्या माध्यमातून महाऔष्णिक वीज केंद्रात पाठवला जातो. मात्र, या प्रक्रियेमुळे परिसरात प्रचंड धूळ आणि प्रदूषण पसरत आहे. यामुळे ऊर्जानगर आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना श्वसनाच्या विकारांचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी केल्या असल्या तरी ठोस उपाययोजना न केल्यामुळे प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे, असा आरोप आमदार सुधाकर अडबाले यांनी आज विधिमंडळात तारांकित प्रश्नाद्वारे केला. निकृष्ट दर्जाचा कोळसा वापरून अनियमितता करून प्रदूषण वाढवणाऱ्या चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील अधिकारी आणि यास पाठबळ देणाऱ्या प्रदूषण

नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का? हवा प्रदूषण कायदा १९८१ च्या कलम २२ आणि २४ नुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाऔष्णिक वीज केंद्राची आजपर्यंत तपासणी केली का? तसेच प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना केल्या आहेत का? असा प्रश्न आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थित केले. त्यावर उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, "आम्हाला तक्रार प्राप्त झाली आहे आणि त्यावर तपासणी केली असता प्रदूषण रोखण्यासाठी सुधारणा करण्याचे आदेश दिले आहेत. ८ नंबर संचाची दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले असून, इलेक्ट्रो स्टॅटिक प्रिसिपेटटरचे परीक्षण केले जाईल. चंद्रपूरसारख्या प्रदूषणग्रस्त भागात एक समिती गठित केली जाईल. या समितीच्या अहवालानुसार पुढील कारवाई केली जाईल, असे त्यांनी आश्वासन दिले.

-----------------------------------

शहीद बाबुराव शेडमाके  जयंती

भारतीय स्वातंत्र्य लढयात मोलाचं योगदान देणारे चंद्रपूरचे आद्य क्रांतीकारक शहीद बाबुराव शेडमाके यांची जयंती आज चंद्रपूरात साजरी करण्यात आली.  यावेळी आदिवासी विकासमंत्री डॉ अशोक उइके, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी आणि जनतेनं शेडमाके यांना आदरांजली अर्पण केली. शेडमाके यांना फाशी दिली त्याठिकाणी आगामी काळात चंद्रपूर इथं भव्य स्मारक उभारण्याचा मानस उइके यांनी यावेळी व्यक्त केला. इंग्रजाच्या जुलमी राजवटीविरोधात शेडमाके यांनी गोंडवाना प्रांतातून विद्रोह पुकारला होता. सशस्त्र उठाव करणाऱ्या या क्रांतीकारकानं इंग्रजांना सळो की पळो करुन सोडलं होतं. इंग्रजांनी त्यांना कपटानं पकडून चंद्रपूर कारागृह परिसरात फाशी दिली होती. त्यांच्या जयंतीनिमित्त आज चंद्रपूरात आदिवासी मेळावा आयोजित करण्यात आला. आरोग्य शिबिर आणि तपासणीचं आयोजनही करण्यात आलं होतं

-----------------------------------

हवामान

हवामान विदर्भात आज सर्वात जास्त तापमानाची नोंद अकोला येथे **39** पूर्णांक **5** अंश करण्यात आली असून सर्वात कमी तापमानाची नोंद गोंदिया येथे **17** पूर्णांक **2** अंश सेल्सिअस करण्यात आली आहे . दरम्यान नागपूरचं कमाल तापमान **37.6** तर किमान तापमान **19.2** अंश सेल्सिअस

इतकं  होत. विदर्भातील सर्वच शहराचे तापमान **35**  अंश सेल्सिअसच्या वर आहे.

-----------------------------------

दुग्ध व्यवसाय

गेल्या १० वर्षात देशातल्या दूध उत्पादनात साडे त्रेसष्ट टक्के वाढ झाली असल्याची माहिती दुग्धव्यवसाय विकास मंत्री राजीव रंजन सिंग यांनी आज राज्यसभेत प्रश्नोत्तरांच्या तासात दिली. दरडोई दुग्धसेवनाबाबत भारताचा जगात पहिला क्रमांक असल्याचं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------